IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# लोकशाही व्यवस्थेसमोरील समकालीन जागतिक आव्हाने

**किर्ती विजय करंजावणे**
संशोधक विद्यार्थी

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*लोकशाही, लोकसंख्या वाढ, मानवी हक्क, स्थलांतर, हवामान बदल, जागतिक आव्हाने*

**ABSTRACT**

लोकशाही ही आधुनिक काळात जागतिक पातळीवर सर्वाधिक स्वीकारली गेलेली राजकीय शासनप्रणाली आहे. लोकसत्ता, समानता, स्वातंत्र्य, कायद्याचे राज्य आणि मानवी हक्कांचे संरक्षण ही लोकशाहीची मूलभूत तत्त्वे मानली जातात. तथापि, एकविसाव्या शतकात लोकशाही व्यवस्थेसमोर अनेक गंभीर आणि गुंतागुंतीची जागतिक आव्हाने उभी ठाकली आहेत. विशेषतः लोकसंख्या वाढ, मानवी हक्कांचे उल्लंघन, आंतरराष्ट्रीय व अंतर्गत स्थलांतर, तसेच हवामान बदल यांसारख्या घटकांनी लोकशाही संस्थांची कार्यक्षमता, निर्णय प्रक्रिया आणि सामाजिक स्थैर्य यावर मोठा परिणाम घडवून आणला आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये या चार प्रमुख आव्हानांचा सविस्तर अभ्यास करून त्यांचा लोकशाही व्यवस्थेवर होणारा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिणाम विश्लेषित करण्यात आला आहे. तसेच या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक उपाययोजनांचा आढावाही घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Karanjavane, K. V. (2026). लोकशाही व्यवस्थेसमोरील समकालीन जागतिक आव्हाने. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 768–773.

**प्रस्तावना**

लोकशाही ही केवळ एक शासनपद्धती नसून ती एक जीवनपद्धती आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समान संधी, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचा सन्मान ही लोकशाहीची मूलभूत वैशिष्ट्ये मानली जातात. प्राचीन ग्रीसमध्ये लोकशाहीचा उगम झाला असला तरी आधुनिक लोकशाहीचा विकास फ्रेंच क्रांती, अमेरिकन स्वातंत्र्यलढा आणि औद्योगिक क्रांतीनंतर अधिक व्यापक स्वरूपात झाल्याचे पाहायला मिळते.

आज जगातील बहुसंख्य देश लोकशाही मूल्यांना प्राधान्य देऊन ही शासनपद्धती म्हणून स्वीकारताना दिसतात.आज मात्र, जागतिकीकरण, तांत्रिक प्रगती, लोकसंख्येतील प्रचंड वाढ, पर्यावरणीय संकटे आणि आंतरराष्ट्रीय संघर्ष यांमुळे लोकशाही व्यवस्थेसमोर नवी आणि गुंतागुंतीची आव्हाने निर्माण झाली आहेत. ही आव्हाने केवळ एका देशापुरती मर्यादित राहिली नसून त्यांना जागतिक स्वरूप प्राप्त झाले आहे.

लोकसंख्या वाढीमुळे संसाधनांवर ताण येतो, मानवी हक्कांचे उल्लंघन लोकशाहीचा आत्माच कमकुवत करते, स्थलांतरामुळे सामाजिक व राजकीय तणाव वाढतात, तर हवामान बदल लोकशाही शासनाच्या दीर्घकालीन नियोजन क्षमतेची कसोटी पाहतो. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम लोकशाहीच्या विकासावर ती टिकण्यावर आणि एवढेच नाही तर लोकशाहीच्या विश्वासार्हतेवर होत आहे. म्हणूनच या संशोधन पेपरमध्ये या चार प्रमुख समकालीन जागतिक आव्हानांचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**लोकसंख्या वाढ आणि लोकशाही व्यवस्थेवरील परिणाम**

**जागतिक लोकसंख्या वाढ : स्वरूप आणि व्याप्ती**

एकविसाव्या शतकात जागतिक लोकसंख्या अभूतपूर्व वेगाने वाढली आहे. अर्थात वैद्यकीय प्रगती, मृत्युदरातील घट, आयुर्मान वाढ आणि काही देशांतील उच्च जन्मदर यांमुळे ही वाढ झाली आहे. त्यातूनही प्रामुख्याने आशिया व आफ्रिका खंडात लोकसंख्या वाढीचा वेग अधिक असल्याचे पाहायला मिळते.

**लोकसंख्या वाढीचे लोकशाहीवरील परिणाम**

लोकसंख्या वाढ ही लोकशाही व्यवस्थेसाठी बहुआयामी आव्हान ठरते:

- **सार्वजनिक सेवांवरील ताण**

  वाढत्या लोकसंखेमुळे आरोग्य, शिक्षण, निवास, पाणीपुरवठा आणि वाहतूक या मूलभूत सेवांवर प्रचंड ताण येतो. शासनाकडून या सेवा पुरेशा प्रमाणात न मिळाल्यास नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होतो.

- **बेरोजगारी आणि गरिबी**

  लोकसंख्या वाढीच्या तुलनेत रोजगारनिर्मिती कमी असल्यास बेरोजगारी वाढते. ही परिस्थिती लोकशाहीतील सामाजिक स्थैर्याला धोका निर्माण करणारी ठरते.

- **राजकीय अस्थिरता**

  आर्थिक विषमता आणि संसाधनांची कमतरता यांमुळे सर्वसामान्य जनतेमध्ये असुरक्षितता आपल्या देशातील सरकार विरुद्ध किंवा शासनाविरुद्ध असंतोष निर्माण होऊन आंदोलन, दंगली यासारखे प्रकार घडून राजकीय अस्थिरता वाढू लागते.

**युवा लोकसंख्या : संधी आणि धोका**

कोणत्याही देशातील लोकसंख्येतील मोठा हिस्सा युवकांचा असल्यास तो निश्चितच लोकशाहीसाठी संधी ठरू शकतो. सुशिक्षित आणि जागरूक युवा वर्ग लोकशाही संस्थांना बळकटी देत असतो. मात्र, या तरुण वर्गाला जर बेरोजगारी, आर्थिक विषमता याचा सामना करावा लागला तर असंतुष्ट युवा वर्ग लोकशाहीविरोधी शक्तींच्या प्रभावाखाली जाऊ शकतो आणि त्याचा परिणाम त्या देशातील संपूर्ण समाजव्यवस्थेवर होतो.

**मानवी हक्क आणि लोकशाही**

**मानवी हक्क**

सामान्यतः प्रत्येक मनुष्य प्राण्याला काही गोष्टी मिळविण्याचा अधिकार आहे आणि या अधिकारांना इतरांनी मान्यता दिलेली असते अशा अधिकारानांच ढोबळमानाने हक्क असे म्हण्टले जाते. या हक्कांमध्ये काही हक्क असे असतात की जे व्यक्तीला जन्मानेच प्राप्त होतात आणि व्यक्तीला जगण्यासाठी, आणि त्याचबरोबर त्याच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी अशा हक्कांची गरज असते. हे हक्क व्यक्तीला जन्मानेच प्राप्त झाल्यामुळे ते हिरावून घेण्याचा अधिकार नसतो अशा हक्कांनाच मानवी हक्क म्हण्टले जाते. सर्वात महत्वाचे म्हणजे हे हक्क व्यक्तीला समाज किंवा राज्य देत नाही तर व्यक्ती जन्माला आली की हे हक्क देखील अस्तित्वात येतात.मानवी हक्कांचा विकास हा नैसर्गिक हक्कांच्या कल्पनेतून झाला आहे. मानवी हक्कांची संकल्पना नैसर्गिक हक्क, कायदेशीर हक्क, नागरी स्वातंत्र्यावर आधारित आहे त्यामुळेच मानवी हक्क हे लोकशाही व्यवस्थेचे मूलभूत आधारस्तंभ मानले जातात. जीवनाचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, समानतेचा हक्क आणि न्यायाचा अधिकार यांशिवाय लोकशाहीची कल्पनाच अशक्य आहे.

**मानवी हक्कांवरील समकालीन धोके**

परंतु आज अनेक लोकशाही म्हणवणाऱ्या देशांमध्ये खालील स्वरूपात मानवी हक्कांवर आघात होताना दिसतो:

- अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घातले जात आहेत.
- पत्रकार, विचारवंत आणि विरोधकांवर कारवाई केली जाते.
- अल्पसंख्याक समुदायांबाबतीत भेदभावाचे धोरण राबविले जाते.
- महिलांवर व बालकांवर होणारे अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे.

याच्यातुनच मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्याचे पाहायला मिळते आणि मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास लोकशाहीवर विपरीत परिणाम झाल्याचे पाहायला मिळते

**मानवी हक्क उल्लंघनाचा लोकशाहीवर परिणाम**

मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास:

- नागरिकांचा शासनावरचा विश्वास निश्चितच कमी होतो.
- लोकशाही संस्था कमकुवत होत जातात.
- आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची प्रतिमा मलीन होते.

आणि म्हणूनच लोकशाही टिकवायची असेल, विकसित करायची असेल तर मानवी हक्कांचे संरक्षण हे केवळ कायदेशीर नव्हे तर नैतिक कर्तव्य मानले पाहिजे.

**स्थलांतर आणि लोकशाही**

**स्थलांतराची संकल्पना**

संयुक्त राष्ट्रांच्या बहुभाषिक लोकसंख्याशास्त्रीय शब्दकोशात स्थलांतराची व्याख्या अशी आहे की, "स्थलांतर म्हणजे एका भौगोलिक एककापासून दुसऱ्या भौगोलिक एककापर्यंत भौगोलिक गतिशीलता किंवा अवकाशीय गतिशीलतेचा एक प्रकार, ज्यामध्ये सामान्यतः मूळ ठिकाण किंवा प्रस्थान ठिकाणापासून गंतव्यस्थान किंवा आगमन ठिकाणी निवासस्थानात बदल होतो . अशा स्थलांतराला कायमस्वरूपी स्थलांतर म्हणतात आणि ते इतर प्रकारच्या हालचालींपासून वेगळे केले पाहिजे ज्यामध्ये ".निवासस्थानाचा कायमस्वरूपी बदल समाविष्ट नाहीआंतरराष्ट्रीय स्थलांतर म्हणजे व्यक्ती किंवा समूहाचे एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात स्थलांतर होय. हे स्थलांतर आर्थिक, सामाजिक, राजकीय किंवा पर्यावरणीय कारणांमुळे घडते. स्थलांतर हे मूलभूत सामाजिक बदलाचे लक्षण मानले जाऊ शकतेबहुतेक देशांमध्ये असे आढळून आले आहे की औद्योगिकीकरण आणि आर्थिक . विकासासोबत शहरातील भागातून, एका शहरातून दुसऱ्या शहरात आणि एका देशातून दुसऱ्या देशात मोठ्या प्रमाणात लोकांचे स्थलांतर झाले आहे.

**स्थलांतराची कारणे प्रामुख्याने खालीलप्रमाणे आहेत.**

- युद्ध व संघर्ष
- गरिबी व बेरोजगारी
- शिक्षण व रोजगाराच्या संधी
- हवामान बदल व नैसर्गिक आपत्ती

**स्थलांतराचे लोकशाहीवरील परिणाम**

- **सामाजिक तणाव:**

  स्थलांतरित व स्थानिक लोकांमध्ये संसाधनांच्या वाटपावरून संघर्ष होऊ शकतो.

- **राजकीय ध्रुवीकरण:**

  स्थलांतर हा अनेक देशांत निवडणुकीतील महत्त्वाचा मुद्दा ठरतो. काही राजकीय शक्ती स्थलांतरविरोधी भावना भडकवतात. त्यामुळे दोन गट निर्माण होतात आणि एकमेकांचा मत्सर करतात.

- **मानवी हक्कांचे प्रश्न:**

  स्थलांतरित व निर्वासितांच्या हक्कांचे संरक्षण न झाल्यास लोकशाही मूल्यांना तडा जातो.

**स्थलांतर व्यवस्थापनाची गरज**

लोकशाही देशांनी मानवी दृष्टिकोनातून स्थलांतर धोरणे आखणे अत्यंत गरजेचे आहे त्याचबरोबर सामाजिक समाकलनाला प्रोत्साहन देणे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवणे आवश्यक आहे.

**हवामान बदल आणि लोकशाही**

**हवामान बदल : स्वरूप**

हवामान बदल हा जागतिक शांतता, सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्याला धोका निर्माण करणारा गंभीर आंतरराष्ट्रीय मुद्दा आहे आज बनला आहे. विकसित आणि विकसनशील देशांमधील मतभेद, तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणारी पर्यावरणीय निर्वासितांची समस्या हे आंतरराष्ट्रीय संबंधांमधील संघर्षाचे मुख्य मुद्दे आहेत. थोडक्यात हवामान बदल म्हणजे पृथ्वीच्या वातावरणातील दीर्घकालीन बदल. औद्योगिकीकरण, जीवाश्म इंधनांचा अतिवापर आणि जंगलतोड यांमुळे हा बदल अधिक तीव्र झाला आहे.

**हवामान बदलाचे परिणाम खालीलप्रमाणे**

- हवामान बदलाचा शेती व अन्नसुरक्षेवर परिणाम होत असतो.
- नैसर्गिक आपत्तींमुळे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत असते.
- आर्थिक नुकसानहोऊन विकासात अडथळे निर्माण होतात.

**हवामान बदल आणि लोकशाही धोरणे**

लोकशाही व्यवस्थेत पर्यावरणीय धोरणे तयार करताना नागरिकांचा सहभाग, पारदर्शकता आणि दीर्घकालीन दृष्टी आवश्यक असते. मात्र, अल्पकालीन राजकीय हितसंबंधांमुळे अनेकदा हवामानविषयक कठोर निर्णय टाळले जातात. हवामान बदल ही जागतिक समस्या असल्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्याशिवाय ती सोडविणे शक्य नाही. लोकशाही देशांनी शाश्वत विकास

आणि पर्यावरणीय न्याय यांना प्राधान्य दिले पाहिजे.

लोकसंख्या, मानवी हक्क, स्थलांतर आणि हवामान बदल ही चारही आव्हाने परस्परांशी निगडित आहेत. यावर उपाय म्हणून:

- समावेशक व दीर्घकालीन धोरणांची आखणी करणे गरजेचे आहे.
- शिक्षण आणि जागरूकतेवर भर दिला गेला पाहिजे.
- आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि संवाद कसा वाढेल यासाठी प्रयत्न केला गेला पाहिजे.

या उपाययोजनांच्या माध्यमातून लोकशाही व्यवस्था अधिक सक्षम बनवता येऊ शकते एवढे मात्र नक्की.

**निष्कर्ष**

लोकशाही व्यवस्थेसमोरील समकालीन जागतिक आव्हाने ही अत्यंत गुंतागुंतीची आणि व्यापक स्वरूपाची आहेत. लोकसंख्या वाढ, मानवी हक्कांचे प्रश्न, स्थलांतर आणि हवामान बदल यांमुळे लोकशाही संस्थांची कार्यक्षमता, सामाजिक स्थैर्य आणि नागरिकांचा विश्वास यावर मोठा परिणाम होत आहे. तथापि, लोकशाही ही आत्मसुधारणेची क्षमता असलेली व्यवस्था आहे. योग्य धोरणे, नागरिकांचा सक्रिय सहभाग, मानवी मूल्यांची जपणूक आणि जागतिक सहकार्य यांच्या माध्यमातून ही आव्हाने संधीमध्ये रूपांतरित करता येऊ शकतात. म्हणूनच लोकशाहीचा टिकाव आणि बळकटी यासाठी सतत जागरूकता आणि प्रयत्न आवश्यक आहेत.

**संदर्भ**

१. देवळांकर शैलेन्द्र, समकालीन जागतिक राजकारण (शीतयुद्धोत्तर प्रश्न), विद्या बुक्स पब्लिशर्स, तिसरी आवृत्ती, सप्टेंबर २०११

२. मिसाळ चंद्रकांत, मानवी हक्क व जबाबदाऱ्या, ॐ व्हिजन अकॅडमी, सुधारित आवृत्ती, १३ जून २०१४

३. देवळांकर शैलेन्द्र, समकालीन जागतिक राजकारण भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने, विद्या बुक्स पब्लिशर्स, पहिली आवृत्ती, सप्टेंबर २०१४

४. अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे, आंतरराष्ट्रीय संबंध: शीतयुद्धोत्तर आणि जागतिकीकरणाचे राजकारण, Orient Blackswan Pvt Ltd, पहिली आवृत्ती, २००८